## गर्भ कसा राहतो?

संतान प्राप्तीसाठी प्राकृतिक रीतीने प्रयत्न केला तर एका वर्षात ८०टक्के महिलांना गर्भधारणा होते. एका वर्षाच्या प्रयत्नानंतरही सफलता न मिळाल्यास त्याला वंध्यत्व म्हणतात.

आधुनिक चिकित्सा पद्धती आणि उच्च प्रतिची औषधे नि:संतान जोडप्यांसाठी आशेचा किरण दाखवणारी आहेत. पुरुषाच्या शरीरातील शुक्रपिंडामध्ये शुक्राणुंचे उत्पादन लाखो प्रमाणात नेहमी सुरु असते. जेव्हा संभोग होतो तेव्हा हे शुक्राणू शुक्रनळीद्वारे वीर्याबरोबर स्त्रीच्या प्रजनन संस्थेत योनिमार्गे प्रवेश करून गर्भाशयाच्या मुखाच्या संपर्कात येतात.

स्त्रीच्या गर्भाशयाच्या दोन्ही बाजूस एकेक अंडाशय असते. मस्तकात जी पिच्युटरी नावाची ग्रंथी असते, त्यात उत्पन्न होणाऱ्या FSH आणि LH नावाच्या होर्मोन्समुळे दरमहिन्याला कोणत्याही एका अंडाशयात स्त्रीबीज विकसित होते. मासिक पाळी येण्याच्या जवळपास १४ दिवसात हे परिपक्व स्त्रीबीज अंडाशयातून वेगळे होऊन, गर्भाशयाबरोबर जोडलेल्या अंडवाहक नलिकेमध्ये (फॅलोपिअन ट्युबमध्ये) प्रवेश करते. अंत:स्त्रावाचा परिणाम गर्भाशयाच्या आतील आवरणावरही होतो आणि पुढे ते गर्भ स्वीकार करण्यास तयार होते.

या वेळी संभोगाद्वारे स्त्रीच्या शरीरात प्रवेश केलेले शुक्राणु, गर्भाशयाच्या मुखाच्या संपर्कात आले तर तेथील स्थित प्रवाहाद्वारे गर्भाशयात प्रवास करून फॅलोपियन नळीत प्रवेश करतात. तिथे स्त्रीबीज फलित गर्भ बनवतो हा गर्भ हळूहळू, तिथून जवळ जवळ ५ दिवसात गर्भाशयात येतो आणि जर तिथे विकसित झाला तर गर्भाच्या रूपाने त्याची वाढ सुरु होते.

जर काही कारणास्तव गर्भ राहिला नाही तर गर्भाशयातील आतील आवरण निघून जाते ज्याला मासिक पाळी असे म्हणतात. आणि पुन्हा दुसऱ्या महिन्यात ही प्रक्रिया परत सुरु होते.

## वंध्यत्व कशामुळे येते?

जेव्हा १०० जोडपी नियमित शरीरसंबंध ठेवून नैसर्गिकरित्या अपत्य प्राप्तीसाठी प्रयत्न करतात, तेव्हा एका वर्षा अखेरीस त्यांच्यापैकी ८० जोडपी यशस्वी होतात. एक वर्षाच्या नियमित शरीरसंबंधानंतर जर जोडप्यास अपत्यप्राप्ती झाली नाही तर त्याला वंध्यत्व म्हणतात.

४० केसेसमध्ये स्त्री वंध्यत्वास जबाबदार असते. ४० केसेस मध्ये पुरुष जबाबदार असतात, १० केसेसमध्ये दोघेही जबाबदार असतात आणि

१० केसेसमध्ये कोणतेही कारण सापडत नाही. (अनिर्णित).

आधुनिक उपचार पद्धती आणि नवीन तंत्रज्ञाच्या मदतीने, अगदी कठीणातल्या कठीण समस्या देखील दूर करून यश मिळवता येते, त्यामुळे शक्यतो प्रत्येक जोडप्यास अपत्यप्राप्तीचे सुख अनुभवता येईल.

**स्त्रीवंध्यत्वाची मुख्य कारणे**

- स्त्री बीज बनत नाही, अनियमित बनतात किंवा चांगले बनत नाहीत.
- बीज अंडाशयातून नीट बाहेर न येणे किंवा नळी बंद असणे किंवा त्यात काही दोष असणे.
- गर्भाशयाच्या मुखाशी आलेले शुक्रकण योग्य रीतीने प्रवास न करणे.
- इतर त्रास जसे एन्डोमेट्रीयोसीस, पॉलीसीस्टीक ओव्हरी, अढेजन
- एन्डोमेट्रीयोसीस - गर्भाशयातील आतील आवरण एन्डोमेट्रीयम, गर्भाशयाशिवाय इतर ठिकाणी वाढणे.
- अढेजन - जर गर्भाशय, फेलोपिअन ट्युबच्या आसपास चे भाग एकमेकांशी जर चिकटले किंवा एकमेकांत मिसळल्यास जाळीसारखे होणे.
- चेपी रोगाचा परिणाम - भुतकाळात झालेले गुप्त रोग किंवा चेपी रोग जसे की पुश्तेती रोग
- अपेंडीक्स किंवा याच्याशी संबंधित कोणताही आजार.
- पॉलिसीस्टीक ओव्हरी, स्त्रीबीज तयार न होणे किंवा योग्य आकार न होणे सारखे विविध त्रास यामध्ये येतात.

**पुरुष वंध्यत्वाचे मुख्य कारण**

- शुक्रकणांचे उत्पादन किंवा वहन न होणे किंवा विर्यात बिलकुल शुक्रकण नसणे ज्यास(Azoospemia) म्हणतात.
- शुक्रकणाचे प्रमाण कमी असणे किंवा त्याची गती कमी असणे.
- अनियमित आकाराच्या शुक्राणुचे प्रमाण जास्त असणे.
- वीर्याचे प्रमाण कमी असणे किंवा वीर्य चेपी आजाराचा परिणाम.
- संभोगात त्रास असणे, मानसिक किंवा शारीरिक त्रासाने वीर्य स्थलन.
- १५ ते २० जोडप्यांमध्ये सर्व तपासणी करूनही कारण समजले नाही तर अशा अवस्थेला (unexplained) वंध्यत्व म्हणतात.

**उपचार**

- उपचार करताना सर्व प्रथम वंध्यत्वाचे कारण शोधुन त्याचा ईलाज केला पाहिजे.

- जर तसे करूनही यश मिळाले नाही किंवा कारण माहीत नसेलल तर, प्रजाननक्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतात. स्त्रीचे वय जास्त असल्यास जास्त प्रभावी उपचार करणे योग्य ठरते.

- शक्यतो वंध्यत्वाचे कारण, जोडप्याची ईच्छा,आर्थिक परिस्थिती आणि मानसिक तयारी लक्षात घेऊन जोडप्याशी चर्चा करून मगच उपचार पद्धती ठरवली जाते. फक्त एक परिपूर्ण वंध्यत्व निवारण संस्थानच एकाच छत्राखाली सर्व प्रकारचे उपचार आणि सर्वोत्तम ईलाज निवडण्याची संधी उपलब्ध करून देऊ शकते.

## ईन्ट्रा युटेराईन ईनसेमीनेशन

गर्भाशयाच्या आत शुक्राणु (विशेष रूपाने तयार केलेला वीर्य) ठेवण्याच्या प्रक्रियेला म्हणजे आय.यु.आय. (IUI) म्हणतात.

वीर्यामध्ये शुक्रकणाशिवाय सेमिनल प्लाझमा, बेक्टेरिया, प्रोस्टाग्लांडिन्स नावाचे पदार्थ असतात. या सर्वांना वेगवेगळे करून चांगल्या आकाराचे आणि ज्यांची गति चांगली आहे अशा शुक्रकणांना लेबोरेटरीमध्ये वेगळे केले जाते.

पतीच्या वीर्यातील अशा प्रकारचे शुक्रकण वेगळे करून त्यांना पोषण दिले जाते. त्यानंतर त्यांना गर्भाशयात ठेवले जाते. प्राकृतिक रूपाने संभोगावेळी वीर्याचे स्खलन योनिमार्गात होते. योनिमार्गातील पी.एच. (PH) ऍसिडीक असतो. त्यामुळे योनिमार्गत स्खलित लाखो शुक्राणु योनीमार्गातच नष्ट होतात. फार कमी शुक्राणु, गर्भाशयाच्या मुखाशी असलेल्या चिकट पदार्थांबरोबर (cervical mucus) मिसळून, हळूहळू गर्भाशयातून फॅलोपिअन नळीमध्ये पोहोचतात

म्हणून हे टाळण्यासाठी वीर्यात जे चांगले शुक्रकण असतात त्यांना वेगळे करून पोषण दिले जाते आणि त्यांची क्षमताही वाढवली जाते आणि त्यांना सरळ गर्भाशयात ठेवले जाते. जेणेकरून ते सरळ फॅलोपिअन ट्युबमध्ये येण्यास अधिक सोपे होते. जर त्यावेळी IUI केले तर स्त्रीबीज आणि पुरुषबीजाचे मिलन होते. त्याचबरोबर फलनही होते आणि गर्भ बनण्याची संभावना आणि क्षमता वाढते.

### आय.यु.आय.का?

आय.यु.आय. केल्याने चांगल्या शुक्रकणांना स्त्रीच्या गर्भाशयात ज्यावेळी स्त्रीबीज वेगळे होते त्यावेळी ठेवले तर मिलनाची संभावना अधिक असते आणि गर्भधारणेची क्षमता वाढते.

## कोणत्या जोडप्यांसाठी उपयोगी ?

### वीर्य काढण्यात त्रास

- शारीरिक रचनेत कोणत्या कमीमुळे त्रास
- मज्जासंस्थेत कमतरता
- मानसिक त्रास
- रिट्रोग्रेड इजॅक्युलेशन

### गर्भाशयाच्या मुखाशी त्रास

- गर्भाशयाच्या मुखाशी जो प्रवाह असतो त्यामधून शुक्राणूंना गर्भाशयाकडे जाण्यास मज्जाव होणे.
- प्रवाहाची मात्र प्रमाणापेक्षा कमी असते.
- गर्भ न राहण्यास कोणतेही कारण न सापडल्यास त्याला unexplained infertility असे म्हणतात.
- स्त्री आणि पुरुष दोघांमध्ये कमतरता असणे.
- शारीरिक कमतरता असणे.

### वीर्यामध्ये कमी असणे

- ओलीगोस्पर्मिया - शुक्रकणांची संख्या कमी असणे.
- अस्थेनोस्पर्मिया - शुक्रकणांची गती कमी असणे.
- टेरॅटोस्पर्मिया - शुक्रकणांचा आकार योग्य नसणे.
- हायपोस्पर्मिया - वीर्याचे प्रमाण (Volume) कमी असणे.

### इतर कारणे :-

- वीर्य चिकट आणि घट्ट असणे.
- शीत वीर्य वापरायचे असेल तर.
- पॉलिसीस्टीक ओवरी (PCO)
- एन्डोमेट्रीओसिस (माईल्ड, मॉडेरट) गर्भाशयाचे आतील आवरण गर्भाशयाच्या बाहेर कुठे असेल तर त्यास एन्डोमेट्रीओसिस म्हणतात.

**ईम्युनॉलॉजीकल**

- पुरुषात शुक्रकणाविरुद्ध ॲन्टीबॉडी असल्यास ते शुक्रकणांची फलनाची क्षमता कमी करते.
- स्त्रीमध्ये शुक्रकणांविरुद्ध ॲन्टीबॉडी असल्यास शुक्राणुंची फलन क्षमता कमी होते.
- ॲन्टीस्पर्म ॲन्टीबॉडी रक्तात किंवा गर्भाशयाच्या मुखाशी देखील असू शकतात.

**आय.यु.आय. केव्हा यशस्वी होते?**

- स्त्रीबीज योग्य संख्येने तयार झाले पाहिजे.
- फेलोपियन ट्युब उघडी हवी.
- वीर्यात योग्य संख्येने गतिशील शुक्राणु असले पाहिजे.

**स्त्रीबीज तयार होणे**

- आय.यु.आय. तेव्हाच यशस्वीपणे होऊ शकते, जेव्हा स्त्रीच्या शरीरात चांगल्या प्रतीचे स्त्रीबीज तयार होते.
- स्त्रीला योग्य वेळी चांगल्या प्रतीचे बीज तयार होण्यासाठी औषध दिले जाते. सोनोग्राफीद्वारे बीजाचा विकास झाला किंवा नाही ते पाहतात, स्त्रीबीज आणि गर्भाशयाचे आवरण (endometrium) तयार झाले की HCG इंजेक्शन बीज फुटण्यासाठी दिले जाते. HCG इंजेक्शननंतर जवळपास ३६ तासांत बीज फुटते.

## फेलोपिअन ट्युब

फेलोपिअन ट्युब खुली असेल तर स्त्रीबीज नळीमध्ये पोहोचते आणि शुक्राणू गर्भाशयाद्वारे नळीमध्ये पोहचतात. फलनाची प्रक्रिया होऊन, नळीमध्ये गर्भ तयार होतो.

## शुक्राणू

फलन यशस्वीरित्या होण्यासाठी नळीमध्ये योग्य संख्येने शुक्राणू असणे जरूरी आहे, म्हणून पतिच्या विर्यामध्ये गतिशील शुक्राणू चांगल्या संख्येने असणे आवश्यक असते.

## स्त्रीबीज करिता

१) नैसर्गिकरित्या स्त्रीबीज तयार होणे.

२) स्त्रीबीज औषधाद्वारे तयार होणे.

**१) आय.यु.आय. :- नैसर्गिकरित्या स्त्रीबीज तयार होते.**

मासिक पाळीच्या २ ते ५व्या दिवसामध्ये सोनोग्राफी केली जाते. त्यानंतर ९-१० व्या दिवशी आणि पुढे स्त्रीबीजचा आकार पडताळून बघण्यासाठी सोनोग्राफी केली जाते. जेव्हा स्त्रीबीज योग्य आकाराचे तयार होते, तेव्हा ते फुटण्यासाठी HCG इंजेक्शन दिले जाते. इंजेक्शन दिल्यानंतर ३६ ते ४४ तासांनी आय.यु.आय. केले जाते.

**२) आय.यु.आय. :- स्त्रीबीज औषधांच्या सहाय्याने बनणे.**

गर्भधारणा होण्यासाठी चांगले स्त्रीबीज तयार होणे ही मूलभूत गरज आहे. जेव्हा चांगल्या प्रतीचे स्त्रीबीज जास्त संख्येने तयार होतात, गर्भधारणेची शक्यता जास्त असते, म्हणून स्त्रीबीज जास्त संख्येने तयार होण्यासाठी औषधे आणि इंजेक्शनचा वापर केला जातो. मासिक पाळीच्या ३ ते ५ व्या दिवसामध्ये TVS (सोनोग्राफी) करून सिस्ट (CYST पाण्याची गाठ) नाही आहे ना हे पाहून मगच औषधे चालू केली जातात. ९-१० दिवसापासून स्त्रीबीजाचे सोनोग्राफीद्वारे (TVS) निरिक्षण केले जाते.

सोनोग्राफीत स्त्रीबीजाचा आकार आणि गर्भाशयाचे अस्तर या दोन गोष्टी तपासून बघितल्या जातात. जेव्हा स्त्रीबीज आणि गर्भाशयाचे अस्तर दोन्ही तयार होतात तेव्हा स्त्रीबीज फुटण्यासाठी (hcg) इंजेक्शन देण्यात येते. HCG इंजेक्शन दिल्यानंतर ३६ ते ४४ तासात स्त्रीबीज फुटून अंडाशयातून वेगळे होते.

## वीर्य तयार करण्याची पद्धत (सीमेन वॉश)

- ज्या दिवशी आय.यु.आय. करायचे आहे, त्याची अपॉईन्टमेंट आधीच दिली जाते.
- आय.यु.आय. च्या दिवशी पतीचे वीर्य त्याच्या सोईनुसार, पण आय.यु.आय.च्या अपेक्षित वेळेच्या एक तास अगोदर घेतले जाते.
- पतीचे वीर्य घेण्याआधी वीर्य कशा प्रकारे घ्यावे त्याबद्दलच्या सूचनांची यादी त्यांना दिली जाते.

- घेतेलेल वीर्य लेबल करून मग त्याचे परिक्षण केले जाते. वीर्य तयार करण्यासाठी लागणाऱ्या सर्व सामानावर ते वापरण्यापूर्वी जोडप्याचे नाव लिहिजे जाते, ज्यामुळे वीर्याची अदलाबदल होत नाही.
- वीर्य तयार करण्याच्या पद्धतीला एक ते दोन तासाचा अवधी लागतो. संपूर्ण प्रक्रियेदरम्यान, वीर्य ३७° सेल्सियस तापमानात ठेवले जाते जे मानवी शरीराचे तापमान असते.
- संपूर्ण प्रक्रिया डिस्पोझेबल मटेरियल (जे परत दुसऱ्या पेशंटसाठी वापरले जात नाही, नष्ट केले जाते) वापरून केली जाते. एका वीर्यासाठी वापरलेल्या वस्तू, कधीही दुसऱ्या व्यक्तीच्या वीर्यासाठी वापरल्या जात नाहीत, जेणेकरून संसर्ग टाळता येतो.
- आय.यु.आय. च्या आदल्या रात्री शरीरसंबंध ठेवावा की नाही याबाबत तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- आय.यु.आय. साठी आपण नेहमीच पतीचे वीर्य वापरतो.

## इन्सेमीनेशन (वीर्य ठेवण्याची प्रक्रिया) :.

- आय.यु.आय.साठी तयार केलेले वीर्य स्त्रीच्या गर्भाशयात ठेवण्याच्या प्रक्रियेला आय.यु.आय. म्हणतात.
- स्त्रीला तपासणी टेबलावर पाय वेगळे करून, अंगाजवळ घेऊन झोपवले जाते. तिला निर्जंतुक टॉवेलने झाकले जाते. एक साधन योनीमार्गात ठेवून, गर्भाशयाचे मुख सर्व्हिक्स (Cervix) बघितले जाते.
- गर्भाशयाच्या मुखाद्वारे एक बारीक नळी आत टाकली जाते. आयु. यु. आय. साठी तयार केलेले वीर्य एका सिरिंजध्ये घेऊन ती कॅन्युलाला जोडली जाते.
- वीर्य हळूहळू गर्भाशयात सोडले जाते
- १० मिनिटे आराम केल्यानंतर पेशंट घरी जावू शकतो.

## ईन्सेमीनेशन नंतर काय काळजी घ्यावी?

- आपण नेहणीप्रमाणे आपली कामे करू शकता.
- खाण्यापिण्याचे काहीही बंधन नाही.




- इन्सेमीनेशन नंतर १-२ दिवस संबंध ठेवणे आपणास हितकारक आहे. त्यानंतर तुमच्या इच्छेप्रमाणे संबंध ठेवता येईल.
- सांगितल्याप्रमाणे वेळेवर औषध घेणे महत्त्वाचे आहे.
- मासिक पाळी अपेक्षित असलेल्या तारखेपेक्षा पाच दिवस जास्त झाले, तर डॉक्टरांना दाखवावे किंवा सकाळची पहिली लघवी घेऊन, त्याने युरीन प्रेग्नन्सी टेस्ट केल्यास गर्भ आहे की नाही हे माहित करता येते.
- जर मासिक पाळी आली तर २, ३, ४ किंवा ५ व्या दिवशी येऊन दाखवावे, जेणे करून पुढील प्रक्रिया चालू करता येईल.

## ल्यूटीयल सपोर्ट

स्त्रीबीज वेगळे झाल्यावर फलितबीजाचा, गर्भाशयामध्ये गर्भरूपात राहण्यासाठी, स्थापित आणि विकसित होण्यासाठी प्रोजेस्टेरॉन नावाचे होर्मोन उपयोगी असते. स्त्रीबीज वेगळे झाल्यानंतर राहिलेल्या बीजाला कॉर्पस ल्युटिअम म्हणतात. मासिक पाळीच्या उत्तरार्धात हे कॉर्पस ल्युटिअम प्रोजेस्टेरॉन तयार

करते. त्याचे प्रमाण कमी असल्यास गर्भधारणेत अडथळा होऊ शकतो. तसे होऊ नये म्हणून आपण आय.यू.आय. नंतर अंगातून ठेवण्याच्या गोळ्या किंवा इंजेक्शन्स किंवा खाण्याच्या गोळ्या देतो.

## आय.यु.आय. चे दुष्परिणाम

- आय.यु.आय. ही सरळ साधी पद्धत आहे. क्वचित रक्तस्त्राव, पोटदुखी, ऍलर्जी, संसर्ग होऊ शकतो.
- जर एखाद्या स्त्रीमध्ये स्त्रीबीज खूप मोठ्या संख्येने तयार झाले, तर जुळी किंवा तिळी मुळे किंवा त्याहून अधिक होण्याची संभावना वाढते.
- ओव्हेरियन हाईपरस्टिम्युलेशन सिंड्रोम.

## आय.यु.आय. चे निकाल

प्रत्येक प्रयत्नांमध्ये १०-१५ गर्भधारणा होण्याची संभावना असते.

## आय.यु.आय. च्या मर्यादा

या उपचार पद्धतीमधे आपण पुरुषबीज स्त्रीबीजाजवळ नेऊन ठेवतो. त्याचे फलन मात्र नैसर्गिकरित्या व्हावे लागते. फलनप्रक्रिया आपण माहिती किंवा नियंत्रित करु शकत नाही. त्या व्यतिरिक्त किती भ्रूण तयार होतात. त्याचा दर्जा कसा आहे, त्यांची निर्मिती आणि त्यांचे वेळेत गर्भाशयात आगमन होते कि नाही, या सर्व गोष्टी आपल्या नियंत्रणाबाहेर आहेत.

## मनात येणारे प्रश्न :

**प्र. आय.यु.आय.साठी कोणाचे पुरुषबीज वापरतात?**

उ. या पद्धतीमध्ये तुमच्या पतिचे वीर्यच वापरले जाते.

**प्र. आय.यु.आय. मध्ये वीर्य बाहेरून घेतले जाते, ते काय असते?**

उ. नाही. आय.यु.आय.मध्ये पतीचे वीर्य वापरले जाते. बाहेरून वीर्य घेऊन आय.यु.आय. केल्यास त्याला कृत्रिम वीर्यदान (AID) असे म्हटले जाते. अशा वेळेस, जोडप्यास त्याबद्दलची कल्पना दिली जाते.आणि दोघांची लिखितरूपी संमती (कन्सेन्ट) घेतली जाते. ती संपूर्णपणे निराळी उपचारपद्धती असून तिचा आय.यु.आय.शी काहीही संबंध नाही.

**प्र. आय.यु.आय. नंतर किती वेळ आराम करावा?**

उ. आय.यु.आय. केल्यानंतर फक्त दहा (१०) मिनिटे आराम करणे आवश्यक असते. त्यानंतर आपण आपली सर्व कामे (घर आणि ऑफिसची) नेहमीप्रमाणे करु शकता.

**प्र. आय.यु.आय. नंतर पोटात दुखते का?**

उ. नाही. ही सरळ आणि वेदनारहित उपचारपद्धति आहे. यामध्ये पोटात अजिबात दुखत नाही. फार क्वचित, जेव्हा गर्भाशयाच्या मुखातून थोडेफार दुखू शकते. पण हे दुखणे काही सेकंदापुरते असते.

**प्र. आय.यु.आय.नंतर जोडप्याने शरीरसंबंध ठेवू नयेत का?**

उ. नाही. आय.यु.आय. नंतर कधीही शरीरसंबंध ठेवता येतात. जेव्हा गर्भधारणेची संभावना जास्त असते. अशा वेळी आय.यु.आय. केले जाते. कधी कधी एकापेक्षा जास्त स्त्रीबीज तयार होतात. तेव्हा हे सगळे स्त्रीबीज एकाच वेळी अंडाशयातून वेगळे होत नाही म्हणून आय.यु.आय. नंतर एक ते दोन दिवसांनी शरीरसंबंध ठेवणे हितकारक असते. त्याव्यतिरिक्त, इतर वेळेस आपल्या इच्छेनुसार शरीरसंबंध ठेवता येतात.

**प्र. आय.यु.आय. किती वेळा करणे योग्य आहे?**

उ. आय.यु.आय. च्या एका प्रयत्नामध्ये गर्भधारणेची शक्यता १० ते १५ असते. सर्वाधिक शक्यता पहिल्या ३ प्रयत्नांमध्ये असते, ४थ्या ते ६व्या प्रयत्नांमध्ये बऱ्यापैकी शक्यता असते. त्यामुळे शक्यतो ३ वेळा, जास्तीत जास्त ६ वेळा आय.यु.आय. करणे योग्य ठरते.

**प्र. आय.यु.आय. अयशस्वी झाले तर पुढे काय?**

उ. आय.यु.आय. असफल होण्यामागची कारणे शोधून त्यांचा इलाज करणे आवश्यक असते. जर आय.यु.आय. अयशस्वी झाले किंवा यशस्वी होण्याची शक्यता कमी असेल, तर जोडप्याने टेस्ट ट्युब अपत्य उपचार (आई.व्ही.एफ.) ची उपचारपद्धती स्वीकारणे योग्य ठरते.

**प्र. आय.व्ही.एफ. (IVF-टेस्ट ट्युब अपत्य उपचार) उपचारपद्धती म्हणचे काय?**

उ. आय.व्ही.एफ. (टेस्ट ट्युब अपत्य उपचार) पद्धतीमध्ये स्त्रीबीज शरीराबाहेर काढले जाते. त्याचे फलन शरीराबाहेर प्रयोगशाळेमध्ये केले जाते. शरीराबाहेर भ्रूण (गर्भ) बनवले आणि विकसित केले जाते. तयार झालेल्या गर्भापैकी सर्वोच्च प्रतीचे गर्भ निवडून ते २ ते ५ दिवसानंतर गर्भाशयात ठेवले जातात.

**प्र. आय.व्ही. एफ. चे रिझल्ट आय.यु.आय. पेक्षा जास्त चांगले आहेत का?**

उ. आय.व्ही.एफ. मध्ये स्त्रीबीज चांगल्या प्रतीचे आहे की नाही, त्याचे फलन होत आहे की नाही, जर फलन झाले तर गर्भ कोणत्या प्रतीचे आहेत, कोणते गर्भ गर्भाशयात ठेवण्यास योग्य आहेत, याबद्दलची माहिती आपणास असते. सामान्यतः जास्त गर्भ बनतात. त्यामुळे चांगल्या प्रतीचे गर्भ निवडून ते गर्भाशयात ठेवता येतात. याद्वारे गर्भ योग्य ठिकाणी पोहोचतात आणि गर्भधारणा होण्याची शक्यता जास्त असते. अशा प्रकारे गर्भधारणा न होण्यामागची अनेक कारणे दूर करता येतात.

**प्र. जर पुरुषबीजाची संख्या किंवा गतिशीलता कमी असेल तर आय.व्ही. एफ. मध्ये यश मिळू शकते का?**

उ. आय.व्ही. एफ. पद्धतीमध्ये फलनाची प्रक्रिया प्रयोगशाळेत केली जाते. यामध्ये एका स्त्रीबीजाचे फलन करण्यासाठी एक शुक्राणु आवश्यक असतो. या उपचारपद्धती ईक्सी (ICSI) असे म्हणतात. त्यामुळे वीर्याशी संबंधित सर्व समस्या उदा. शुक्राणुंची संख्या कमी असणे, गतिशीलता कमी असणे, आकार योग्य नसणे, वगैरे ईक्सी पद्धतीने दूर करता येतात.

**प्र. अझूस्पर्मिया (शुक्राणु अजिबात नसणे) मधे इक्सीचा उपयोग होऊ शकतो का?**

उ. शुक्रपिंडामध्ये थोड्याफार प्रमाणात जरी शुक्राणुंचे उत्पादन होत असेल तर, ते शुक्राणु शुक्रपिंड (टेस्टीस) किंवा शुक्राणु वाहक नलिका (एपिडीडायमस) मधून मिळवता येतात आणि त्यांच्या सहाय्याने ईक्सीची उपचारपद्धती करता येते. म्हणून ''अझूस्पर्मिया चा ईलाज आता करण्याजोगा आहे. बरेचसे अझूस्पर्मिया असलेले पुरुष आता ईक्सीच्या मदतीने स्वत:च्या बालकाचे पिता बनू शकतात.

**प्र. कोणी आय.यु.आय. करावे? किती वेळा करावे? इंजेक्शन किती घ्यावेत?**

उ. या सर्व प्रश्नांची उत्तरे किचकट आहेत. म्हणूनच तो निर्णय तुम्ही निष्णांत डॉक्टरांवरच सोपवलेला बरा.


आमची संस्था भारत देशातील
सर्वश्रेष्ठ आणि अत्याधुनिक आहे.
येथे तुम्हाला मिळेल सर्वोच्च प्रतिचा
सल्ला आणि उपचार
आम्ही तुमच्या बरोबर आहोत.....

बावीशी® फर्टीलीटी ईन्स्टीट्युट

सरल - सलामत - स्मार्ट - सफल

मंजुलाल म्युनीसीपल गार्डन के सामने, ओरीओन बिल्डींग एवम् अदाणी सीअेनजी के पास,
पालडी चार रस्ता, पालडी, अहमदाबाद - 380 007.
फोन : 079-40404646 मो. 98795 72298
E-mail : drbavishi@ivfclinic.com I Web. : www.ivfclinic.com

अहमदाबाद । मुंबई । दिल्ही । कोलकता । सुरत । वडोदरा । भूज